सामान्य प्रशासन विभाग,
सेवाभरती व परीक्षा नियंत्रण विभाग,
पुणे महानगरपालिका
दि.०४/०९/२०२६

## -: उमेदवारांना सूचना :-

विषय :- पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील "कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)" पदाच्या भरती प्रकरणी उमेदवारांची प्रमाणपत्रे /कागदपत्रे पडताळणी करणेबाबत.

वरील नमूद विषयान्वये पुणे महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर **अनाथ** या प्रवर्गातील उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात आलेली असून, या यादीतील उमेदवारांनी दि.१०/०९/२०२६ रोजी उमेदवारांनी सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेमध्ये छत्रपती शिवाजी महाराज सभागृह (जुना G.B. hall), तिसरा मजला, मुख्य इमारत, मनपा भवन, शिवाजीनगर, पुणे-०५, येथे कागदपत्र पडताळणीसाठी आपण ऑनलाइन भरलेल्या अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे मूळ कागदपत्रे व प्रमाणपत्रांसह व त्यांच्या १ छायांकित प्रतीसह समक्ष उपस्थित राहावे.

ज्या आरक्षित जागेकरिता अर्ज केला आहे, त्या आरक्षणासाठी आवश्यक असलेली मूळ प्रमाणपत्रे सोबत आणणे आवश्यक आहे. कागदपत्र तपासणीचे वेळी अपूर्ण कागदपत्रे सादर केल्यास पुढील प्रक्रियेसाठी उमेदवाराचा विचार केला जाणार नाही. तसेच याबाबत कोणतीही तक्रार अथवा सबब विचारात घेतली जाणार नाही.

### सोबत आणावयाची मूळ कागदपत्रे

| अ.क्र | कागदपत्रे /प्रमाणपत्रे यादी |
|---|---|
| १ | अर्जदाराची माहिती बरोबर असल्याचे स्वयंघोषणा पत्र (छाननीचे वेळी नमुना देण्यात येईल) |
| २ | एस.एस.सी., एच.एच.सी. प्रमाणपत्र |
| ३ | वयाचा पुरावा (एम.एस.सी. प्रमाणपत्र, जन्मदाखला, शाळा सोडल्याचा दाखला इत्यादी) |
| ४ | पदाच्या शैक्षणिक अर्हतेबाबतचा पुरावा (गुणपत्रिका व प्रमाणपत्र) |
| ५ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा (प्रमाणपत्र) |
| ६ | राखीव प्रवर्गातून निवड झालेल्या उमदेवारांचे संबंधित प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र (अज प्रवर्गासाठी जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक) |
| ७ | वैध नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र |
| ८ | जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र |
| ९ | अनाथ आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा (अनाथ या समांतर आरक्षणाचा लाभ यापूर्वी घेतले नसलेबाबतचे प्रतिज्ञापत्र रु. ५००/- स्टँपवर) |
| १० | अनाथ आरक्षणाचा दावा असल्यास अधिवास प्रमाणपत्र |
| ११ | विवाहित स्त्रियांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा |
| १२ | नावात बदलाचा पुरावा (विवाह नोंदणी / राजपत्र इत्यादी) |

e:\उमेदवार सूचना.docx

| | |
|---|---|
| १३ | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र |
| १४ | महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असल्याबाबतचे प्रमाणपत्र (डोमासाईल) |
| १५ | शासन निर्णय मार्तसं २०१२/प्र.क्र. २७७/३९ दि.०४.०२.२०१३ मध्ये नमूद प्रमाणे MSCIT अथवा समकक्ष प्रमाणपत्र. |

जर आपण गैरहजर राहिलात किंवा आवश्यक कागदपत्रांची पूर्तता नाही केली तर पुढील उचित कार्यवाही एकतर्फी करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

- पुणे महानगरपालिकेस आवश्यक वाटल्यास अन्य कागदपत्रांची पूर्तता करावी लागेल.
- उमेदवार जाहिरातीत नमूद सर्व अर्हता धारण करीत असलेचा सिद्ध करणारा पुरावा / दस्तऐवज देणे अर्जदाराची जबाबदारी असेल.

वरीलप्रमाणे पूर्तता न केल्यास निवड प्रक्रियेसाठी उमेदवाराच्या नावाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली यादी हि केवळ संभाव्य निवड / प्रतीक्षा यादीच्या कक्षेतील (consider zone) असून उमेदवारांनी त्यांचा निवड/ प्रतीक्षा यादीमध्ये समावेश झाला असे समजू नये. कागदपत्रांची तपासणी पूर्ण झाल्यानंतर अंतिम निवड / प्रतीक्षा यादी अलाहिदा प्रसिध्द करण्यात येईल.

कागदपत्र तपासणीसाठी संबंधित उमेदवार यांनी स्वखर्चाने उपस्थित राहावयाचे आहे. वरील प्रक्रियेबाबत काही प्रश्न निर्माण झाल्यास मा. महापालिका आयुक्त यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

(किशोरी शिंदे)
उप आयुक्त
सामान्य प्रशासन विभाग
पुणे महानगरपालिका